मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरीच्या आयुक्तांनी विद्यार्थ्यांना दिला यशस्वी होण्याचा कानमंत्र

## पिंपरी चिंचवड पालिकेचा वार्षिक स्नेह उत्सव आणि गुणगौरव सोहळा : निगडी प्राधिकरण येथील ग.दि. माडगूळकर सभागृहात संपन्न झाला.

**पिंपरी | प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमासोबत आयुष्यात आपण चांगले माणूस म्हणून कसे घडू यावर लक्ष केंद्रित करावे." असा यशस्वी होण्याचा कानमंत्र आयुक्त शेखर सिंह यांनी महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांना दिला.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या वतीने निगडी प्राधिकरण येथील ग.दि. माडगूळकर सभागृहात वार्षिक स्नेह उत्सव, गुणगौरव आणि पारितोषिक वितरण सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.




या कार्यक्रमात पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, सहाय्यक आयुक्त शिक्षण विभाग विजयकुमार थोरात, शिक्षण विभागाच्या प्रशासन अधिकारी संगीता बांगर, तसेच प्राथमिक शाळांमधील सर्व मुख्याध्यापक आणि शाळा व्यवस्थापन समिती व शिक्षण विभागाचे सर्व कर्मचारी उपस्थित होते. सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात यांनी स्वागत केले, तर शालेय विद्यार्थ्यांनी बनवलेल्या वस्तू देऊन प्रशासन अधिकारी संगीता बांगर यांनी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे यांचा सन्मान केला.

आयुक्त शेखर सिंह यांनी शिक्षण क्षेत्रात अविरत काम करत राहिल्यास सर्व समस्यांना तोंड देऊ शकू असा विश्वास व्यक्त केला. "विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमासोबत आयुष्यात आपण चांगले माणूस म्हणून घडू यावर लक्ष केंद्रित करावे." गेल्या तीन वर्षांत शिक्षण विभागात शिक्षक आणि पालकांच्या मदतीने खूप चांगले बदल घडवून आणले आहेत. "आजही अनेक शाळांच्या खोल्या व मैदानांच्या समस्या आहेत, परंतु येणाऱ्या पाच वर्षांत आपण असेच काम करत राहिलो तर सर्व समस्यांना तोंड देऊ शकतो," असेही त्यांनी सांगितले. यावर्षी भोसरी, दापोडी, दिघी येथील शाळांमध्ये डान्स रूम, कला कक्ष, स्टाफ रूम अशा सुविधा उपलब्ध करून देणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

आयुक्त सिंह यांनी इयत्ता आठवी, नववी, दहावीच्या विद्यार्थ्यांवर अधिक लक्ष केंद्रित करण्याची गरज असल्याचे सांगितले. 64 शाळांमध्ये कला आणि क्रीडा शिक्षक लवकरच रुजू होणार असल्याचीही त्यांनी माहिती दिली. "लवकरच विद्यार्थ्यांना एकाच छताखाली सर्व प्रकारचे खेळ खेळता येतील आणि लवकरच यावर उपाययोजना करून काम सुरू करणार आहोत," असेही त्यांनी सांगितले.

### पवित्र पोर्टलद्वारे मिळणार 300 शिक्षक

» सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात यांनी सांगितले की, सारथी पोर्टलद्वारे ८८ टक्के तक्रारी निकाली काढल्या आहेत आणि ३५ तक्रारी प्रलंबित आहेत, ज्यांवर देखील लवकरच कारवाई होणार आहे. "जून-जुलैमध्ये पवित्र पोर्टलद्वारे २५० ते ३०० कायमस्वरूपी शिक्षक शाळांना मिळणार आहेत," असेही त्यांनी सांगितले. आयुक्त शेखर सिंह हे पालिकेतील शिक्षण विभागाला प्राधान्य देत मार्गदर्शन करीत असल्याबद्दल थोरात यांनी त्यांचे आभार मानले.

# जागतिक वसुंधरा दिनानिमित्त 2000 देशी झाडांच्या बियाणांचे मातीचे गोळे सीडबॉल बनवून 80 चिमुकल्यांकडून वेगळा उपक्रम

## निसर्ग राजा मैत्र जिवांचे चे श्री. माणिक गजानन धर्माधिकारी यांनी यावेळी सर्वांना पर्यावरणाचे महत्त्व पटवून दिले

**पिंपरी | प्रतिनिधी**

जागतिक वसुंधरा दिनानिमित्त चिमुकल्यांकडून विविध प्रकारच्या 2000 देशी झाडांच्या बियाणांचे मातीचे गोळे सीडबॉल बनविण्यात आले. निसर्ग राजा मैत्र जिवांचे चे श्री. माणिक गजानन धर्माधिकारी यांनी यावेळी सर्वांना पर्यावरणाचे महत्त्व पटवून दिले.



डॉ. सचिन राजे यांच्या पुढाकाराने व नवनाथ भामे, मोनीश तेली, साईदास शिंदे, रूपेश जाधव, अमित कुलकर्णी, विजय सूर्यवंशी, राजेश देशमुख, डॉ. प्रकाश जुंकटवार, अमृता घोष व इतर रहिवाशी यांच्या मार्गदर्शनामुळे व सहकार्यामुळे यशस्वी झाला. यानिमित्ताने मुलांनी काळी व लाल माती एकजीव करून प्रत्येकी एक बियांपासून 2000 सीडबॉल बनवले. आता येणार्या सुट्टीत हीच 80 मुले प्रत्येकी 25 सीडबॉल भारताच्या विविध भागात फेकतील व येणार्या पावसात नैसर्गिक पद्धतीने 2000 झाडांचे वृक्षारोपण होईल. मोबाईल च्या विश्वात अशा पर्यावरणपूरक कृतीने मुलांवर योग्य संस्कार होतील व ग्लोबल वॉर्मिंग चा धोका कमी होईल.

# '...तर पाकिस्तानवर तहानेने मरण्याची वेळ येईल', मुख्यमंत्री फडणवीस

## जे लोक व्हिसा घेऊन पाकिस्तानमधून आले आहेत. त्यांना नोटीसा दिल्या असून ते पुन्हा जात असल्याचं मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितलं.

**पुणे | प्रतिनिधी**

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात तब्बल २६ जणांचा मृत्यू झाला, यामध्ये महाराष्ट्रातील ६ जणांचा समावेश आहे. या हल्यानंतर भारताने मोठं पाऊल उचलत काही महत्वाचे निर्णय घेतले. पाकिस्तानी नागरिकांना ४८ तासांत भारत सोडण्याचे आदेश देण्यात आले, तसेच सिंधू पाणी करारही स्थगित केला. त्यामुळे दोन्ही देशांमधील तणाव वाढला आहे.

या बरोबरच केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना निर्देश देत ज्या त्या राज्यातील सर्व पाकिस्तानी नागरिकांना बाहेर काढण्याच्या सूचना दिल्या होत्या. या संदर्भात बोलताना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं की जे लोक व्हिसा घेऊन पाकिस्तानमधून आले आहेत. त्यांना नोटीसा दिल्या असून ते पुन्हा जात असल्याचं मुख्यमंत्री फडणवीसांनी सांगितलं. तसेच पाकिस्तान ज्या पाण्यावर निर्भर आहे, ते पाणी जर भारताने आडवणं सुरु केलं तर पाकिस्तानवर अक्षरश: तहानेने मरण्याची वेळ येईल', असंही फडणवीस यांनी म्हटलं आहे.

"खरं म्हणजे पाकिस्तानच्या सरकारला हे समजलं पाहिजे की त्यांची निर्भरता ही भारतावर आहे. त्या प्रकारे ते दहशतवाद्यांना समर्थन देतात आणि मानवतेचा एक प्रकारे खून करतात. मला असं वाटतं जगातला कुठलाही देश पाकिस्तानबरोबर उभा राहू शकत नाही. ही पाकिस्तानची परिस्थिती आहे. त्यांच्याकडे खायला पैसे नाहीत आणि ते न्यू क्लिअर बॉम्बचं काय सांगतात?", असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

भारताने २३ एप्रिल रोजी काही महत्वाचे निर्णय घेत पाकिस्तानी नागरिकांना भारत सोडण्याचे आदेश दिले. तसेच सिंधू पाणी करारही स्थगित केला. या सिंधू पाणी करारासंदर्भात बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं की, "त्या पाण्यावर पाकिस्तान निर्भर आहे, ते पाणी जर भारताने आडवणं सुरु केलं तर पाकिस्तानवर अक्षरश: तहानेने मरण्याची वेळ येईल. त्यामुळे अशा प्रकारची जागा दाखवावी लागते", असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले आहेत.



### शोधण्याची कारवाई सुरू

» "'जे लोकं पाकिस्तानमधून या ठिकाणी व्हिसा घेऊन आलेले आहेत, त्यांची सर्व माहिती राज्य सरकारकडे उपलब्ध आहे. जर कोणी अवैधरित्या आलं असेल तर त्यांनाही शोधण्याची कारवाई सुरू असते. ज्या प्रमाणे अवैध बांगलादेशी आपल्याकडे सापडतात, तसं अवैध पाकिस्तानी सापडत नाहीत. त्यामुळे आता पहिल्यांदा जे लोक व्हिसा घेऊन पाकिस्तानमधून आलेले आहेत. त्यांना पहिल्यांदा ४८ तासांत बाहेर काढायचं आहे. त्या संदर्भात पोलीस व्यवस्थित काम करत आहेत", असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

### गणबोटे-जगदाळे कुटुंबियांचे सांत्वन

» जम्मू काश्मीरमधील पहेलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या कौस्तुभ गणबोटे आणि संतोष जगदाळे या पर्यटकांच्या घरी जाऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या कुटुंबियांचे सांत्वन केले. आतापर्यंत ज्याप्रमाणे आपण खंबीर राहिले त्याचप्रमाणेच यापुढेही खंबीर राहावे, राज्य शासन आपल्या दुःखात सहभागी असून आपल्या पाठीशी आहे, अशा शब्दात मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यांना धीर दिला.



### 'त्या' सहा परिवारांना सर्व मदत सरकार करेल'

» 'पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला, यामध्ये महाराष्ट्रातील सहा पर्यटकांचा समावेश आहे. दरम्यान, या सहा परिवारांना जी काही मदतीची आवश्यकता लागेल ती सर्व मदत राज्य सरकार करणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना दिली आहे.

# वैद्यकीय शिक्षणाच्या 75 हजार जागा पाच वर्षांत वाढविणार, केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा

## लवळे येथील सिम्बायोसिस रुग्णालय व संशोधन केंद्राच्या मूत्रपिंड आणि मूत्रविकार केंद्राचे उद्घाटन जेय पी. नड्डा यांच्या हस्ते करण्यात आले.

**पुणे | प्रतिनिधी**

भारतामध्ये वैद्यकीय शिक्षण घेतलेले विद्यार्थी परदेशामध्ये सेवा देतात, असे चित्र आहे. त्यामुळे देशाला अधिक संख्येने डॉक्टर मिळावेत यासाठी पुढील पाच वर्षांत वैद्यकीय पदवी आणि पदव्युत्तर पदवी शिक्षणाच्या ७५ हजार जागा वाढविल्या जाणार आहेत', असे प्रतिपादन केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांनी शनिवारी केले. 'प्राथमिक शिक्षण हा मूलभूत हक्क आहे. व्यावसायिक शिक्षण हे व्यक्तिगत फायद्याचे आहे. त्यामुळे समाजाला परत करणे हे तुमचे उत्तरदायीत्व असले पाहिजे', अशी अपेक्षा नड्डा यांनी व्यक्त केली.



लवळे येथील सिम्बायोसिस रुग्णालय व संशोधन केंद्राच्या मूत्रपिंड (नेफ्रोलॉजी) आणि मूत्रविकार (युरोलॉजी) केंद्राचे उद्घाटन जेय पी. नड्डा यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी नड्डा बोलत होते. सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाचे कुलपती डॉ. शां. ब. मुजुमदार, प्र-कुलपती डॉ. विद्या येरवडेकर, वैद्यकीय आणि आरोग्य विज्ञान विद्याशाखेचे प्रमुख डॉ. राजीव येरवडेकर या वेळी उपस्थित होते.

नड्डा म्हणाले, 'राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानकांनुसार (एनडब्ल्यूएएस) सध्या ३० हजार आयुष्मान आरोग्य मंदिर आहेत आणि आमचे लक्ष्य हे लवकरच १ लाख ७५ हजार आयुष्मान आरोग्य मंदिरे निर्माण करण्याचे आहे जेणेकरून सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवा प्रदान करता येईल. याद्वारे लोकांच्या आरोग्यावर लक्ष केंद्रित करण्याबरोबरच विस्तारित आरोग्य सेवा देण्यात येईल.'

'प्रत्येक गोष्ट मोफत देणे शक्य नाही परंतु सिम्बायोसिस आरोग्यधाममध्ये त्यांनी ते शक्य केले आहे. महिलांसाठी महाविद्यालय ही उत्तम गोष्ट साकारली आहे. सध्या हे केंद्र स्वरूपात असले तरी भविष्यात ही संस्था होईल. सिम्बायोसिस सारख्या संस्था आणि सरकार यांनी एकत्र येऊन आरोग्य क्षेत्रात सर्वसमावेशक स्वरूपाची धोरणे तयार करावीत', अशी अपेक्षा नड्डा यांनी व्यक्त केली. डॉ. मुजुमदार, डॉ. विद्या येरवडेकर आणि डॉ. राजीव येरवडेकर यांनी मनोगत व्यक्त केले.

> अनेक वर्षे या देशात एकच भारतीय आयुर्विज्ञान संस्था (एम्स) होती. अटलबिहारी वाजपेयी यांनी पाच एम्स सुरू केल्या. तर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कालखंडात गेल्या दहा वर्षांत १६ एम्स सुरू झाल्या आहेत.
>
> - जे. पी. नड्डा, केंद्रीय आरोग्यमंत्री

# कोट्यवधींचा खर्च करूनही नागरिकांना दूषित पाणी ?

## दूषित पाण्याचे नमुने दाखविल्यानंतरही महापालिका प्रशासन पाणी पिण्यायोग्य असल्याचा दावा करीत आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने कोट्यवधी रुपयांचा खर्च करून संपूर्ण शहराला पिण्याचा पाणीपुरवठा केला जात आहे. मात्र, काही भागांत दूषित तसेच, दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे. दूषित पाण्याचे नमुने दाखविल्यानंतरही महापालिका प्रशासन पाणी पिण्यायोग्य असल्याचा दावा करीत आहे.

पाण्यातील पी. एच. म्हणजे पाण्याचे आम्लीय किंवा मूलभूत प्रमाण (ॲसिडिक किंवा बेस) मोजण्यासाठी वापरले जाणारे एक माप आहे. हे 0 ते 14 पर्यंतच्या स्तरावर मोजले जाते. जिथे 7 तटस्थ (न्यूट्रल) मानले जाते. 7 पेक्षा कमी पी. एच. म्हणजे पाणी आम्लयुक्त (ॲसिडिक) आहे. 7 पेक्षा जास्त पी. एच. म्हणजे पाणी मूलभूत (बेसिक) आहे. तसेच, प्रयोगशाळेत पाण्यातील गढूळपणा, जडपणा, क्लोरिनचे प्रमाण आणि ई. कोली विषाणूचे प्रमाण तपासले जाते.

जलशुद्धीकरण केंद्रांत पाणी शुद्ध करण्यासाठी क्लोरीन पावडरऐवजी आता क्लोरीन वायू स्वरूपात वापरला जातो. त्यासाठी सहा गॅसटाक्या जोडलेल्या आहेत. त्या संपल्या की पर्यायी गॅस टाक्या आहेत. त्यामुळे 24 तास क्लोरीन गॅस पाण्यात मिसळण्याची प्रक्रिया सुरू असते. पाण्यात क्लोरिन मिसळल्याने महापालिकेद्वारे पुरवठा केल्या जाणाऱ्या पाण्यात विषाणू (बॅक्टेरिया) तयार होऊ शकत नाहीत. क्लोरिन नसल्यास विषाणू तयार होतात, असे पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.



### आरोग्याचा प्रश्न गंभीर

» ऐन उन्हाळ्याच्या हंगामात शहरात दूषित आणि दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठा होत असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. घाण पाण्यामुळे जुलाब, उलट्या, मळमळणे, ताप आदी आजार होत आहेत. विशेषत: लहान मुले व ज्येष्ठांना त्यावर त्यांचा अधिक दुष्परिणाम दिसून येत आहे. नियमितपणे पाणीपट्टी भरूनही पिण्यासाठी घाण पाणी येत असल्याने संताप व्यक्त केला जात आहे. पाण्याच्या टाक्या स्वच्छ करून घेऊन आणि गळती दुरुस्ती केल्यानंतरही असे प्रकार कायम आहेत. उन्हाळ्यात काही भागांत दूषित आणि दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठा तर, पावसाळ्याच्या सुरुवातीच्या दिवसात गढूळ पाणीपुरवठा होतो. शहरातील अनेक भागांतील पाण्याचे नमुने तपासणीसाठी घेतले जातात. त्या पाण्याची पिंपरी येथील खासगी प्रयोगशाळेत दोन वेगवेगळ्या प्रकारे तपासणी केली जाते. तसेच, महापालिकेच्या निगडी, सेक्टर क्रमांक 23 येथील जलशुद्धीकरण केंद्रातील प्रयोगशाळेतही तपासणी केली जाते. या दोन्ही प्रयोगशाळेत महापालिकेचे पाणी पिण्यायोग्य असल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे नागरिक दूषित व दुर्गंधीयुक्त पाण्याबाबत करत असलेल्या तक्रारींत तथ्य नसल्याचा महापालिका प्रशासनाचे मत असल्याचे स्पष्ट होत आहे.

### स्कॉडा प्रणाली विकसित

» महापालिका पाणीपुरवठ्यावर दरवर्षी एकूण 228 कोटी रुपयांचा खर्च करते. पवना, आंद्रा आणि भामा आसखेड धरणातून पाणी घेत असल्याने महापालिका दरवर्षी सुमारे 45 कोट्यवधी रूपयांचे शुल्क पाटबंधारे विभागास अदा करते. तसेच, एमआयडीसीकडून दररोज 30 एमएलडी शुद्ध पाणी घेतले जात असून, त्याचे बिल एमआयडीसीला दिले जाते. अशुद्ध पाणी उपसा, जलशुद्धिकरण, पाणीपुरवठा व्यवस्थापन, पाण्याच्या टाक्या, पाणीपुरवठा विभागाचे मनुष्यबळ, नियमित व दुरुस्ती कामे आदींसाठी दरवर्षी कोट्यवधींचा खर्च महापालिकेस करावा लागतो. संपूर्ण शहराला समन्यायिक पद्धतीने पाणीपुरवठा व्हावा म्हणून स्कॉडा प्रणाली विकसित केली आहे.

### सर्व सॅम्पलचे रिपोर्ट निगेटिव्ह

» महापालिकेकडून नियमितपणे शहरातील क्षेत्रीय कार्यालयानुसार प्रत्येक भागांतून पिण्याचे पाण्याचे नमुने घेतले जातात. त्याची प्रयोगशाळेत तपासणी केली जाते. एक जानेवारी ते 31 मार्च 2025 या तीन महिन्यांत तब्ब 22 हजार 288 पाण्याचे सॅपल तपासले गेले आहेत. त्यात सर्व ठिकाणचे पाणी पिण्यायोग्य म्हणजे निगेटिव्ह असल्याचे अहवालावरून समोर आले आहे. शहरातील कोणत्याही भागांतील पाणी हे पिण्यायोग्य नाही, असे एकाही ठिकाणच्या नमुन्यात आढळून आलेले नाही. तसेच, पिंपरीतील खासगी प्रयोगशाळेत तपासलेल्या शहरभरातील वेगवेगळ्या 48 नमुन्यातही पाणी पिण्यायोग्य असल्याचा रिपोर्ट प्राप्त झाले आहेत. हा तपासणी अहवाल 48 तासांत प्राप्त होतो. तो अहवाल दरमहा राज्य शासनाला सादर केला जातो.

# ‘आमदार आपल्या दारी’ उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

## आमदार आपल्या दारी’ या उपक्रमाचे आयोजन रहाटणी येथील थोपटे लॉन्समध्ये करण्यात आले होते

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभा मतदारसंघातील रहिवाशांच्या अडचणी, समस्या आणि स्थानिक प्रश्न थेट जाणून घेण्यासाठी ‘आमदार आपल्या दारी’ या उपक्रमाचे आयोजन रहाटणी येथील थोपटे लॉन्समध्ये करण्यात आले होते. या उपक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमात नागरिकांनी आपल्या परिसरातील विविध समस्या मांडल्या. यामध्ये रस्त्यांची दुर्दशा, अपुरा पाणीपुरवठा, वीजपुरवठ्याची समस्या, स्वच्छतेचा अभाव, ड्रेनेजची अडचण अशा महत्त्वपूर्ण विषयांचा समावेश होता. उपस्थित अधिकाऱ्यांनी नागरिकांचे म्हणणे गांभीर्याने ऐकले आणि आमदारांकडून तातडीने आवश्यक सूचना देण्यात आल्या.



कार्यक्रमाच्या माध्यमातून राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभही देण्यात आला. विशेषतः श्रावण बाळ योजना, संजय गांधी निराधार योजना यांतून पात्र लाभार्थ्यांना पेन्शन पत्रके वाटप करण्यात आली. यामुळे अपंग, ज्येष्ठ नागरिक, विधवा महिलांना दिलासा मिळाला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या निष्पाप भारतीय नागरिकांना श्रद्धांजली अर्पण केली. देशासाठी प्राण गमावलेल्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करताना वातावरण भावनिक झाले.

### लोकप्रतिनिधींशी थेट संवाद

» ‘आमदार आपल्या दारी’ उपक्रमामुळे लोकप्रतिनिधींशी थेट संवाद साधता येतो, समस्यांचे निवारण जलद गतीने करता येते, यामुळे नागरिकांमध्ये समाधानाची भावना दिसून आली. जनतेच्या प्रश्नांवर प्रत्यक्ष निर्णय घेण्याचे काम या कार्यक्रमातून झाले, असे मत अनेकांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमास अतिरिक्त तहसीलदार जयराज देशमुख, भाजपचे कार्यकारी अध्यक्ष शत्रुघ्न काटे, माजी नगरसेवक कैलास थोपटे, नगरसेवक बाबासाहेब त्रिभुवन, चंद्रकांत नखाते, सविता खुळे, स्वीकृत नगरसेवक गोपाळ माळेकर, संदीप गाडे, विनोद तापकीर, संदीप नखाते, मंडल अध्यक्ष सोमनाथ तापकीर, हर्षल नढे, संजय गांधी निराधार योजनेचे अध्यक्ष नरेंद्र माने, सदस्य संजय मराठे, आदिती निकम, कुंदा गडदे, सामाजिक कार्यकर्ते गणेश नखाते, देविदास तांबे, नरेश खुळे, विशाल माळी, संजय भोसले, बाळासाहेब पवार, रणजीत घुमरे, दिगंबर सुरवसे, युवा मोर्चा अध्यक्ष राज तापकीर, संकेत माळेकर, बूथ प्रमुख ब्रह्मा सूर्यवंशी, आकाश जाधव यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# निवडणुकीपूर्वीची संघटनात्मक बांधणी

## मंत्र्यांचे दौरे, पक्ष प्रवेशाची लगीनघाई : झेडपीच्या निवडणुकांची संकेत

**पुणे | प्रतिनिधी**

गेल्या तीन ते चार वर्षांपासून लांबलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका येत्या तीन महिन्यांतच होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अनेक आमदार, मंत्री हे मंत्रालयात कमी परंतु आपआपल्या मतदारसंघात आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांची संघटन बांधणी करताना दिसून येत आहेत. त्यासाठी झेडपी, नगरपरिषदेच्या निवडणुकीपूर्वीची संघटनात्मक बांधणी सुरू आहे. यामध्ये मंत्र्यांच्या दौऱ्याचे निमित्त करून पक्षप्रवेश सोहळे होत आहेत. हेच संकेत मिळत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार हे पूर्वी शक्यतो एकाच कार्यक्रमात दिसत होते. जेणेकरून महायुतीत कोणतीही अडचण नाही, असे दाखवायचे. परंतु अलीकडील काळात मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री हे आपापले वर्चस्व असणाऱ्या मदतसंघात कार्यकर्त्यांची बांधणी व संपर्क करताना दिसून येत आहेत. मागील काळात तिन्ही पक्षांच्या सरकारमध्ये काम करीत असताना आपल्या जवळच्या अनेकांना संधी देता आली नाही.

सध्या महायुतीला पोषक वातावरण नाही. सत्तेच्या सोपानावर विराजमान झाल्यापासून राजकीय घडामोडी, गंभीर घटनांमुळे सत्ताधारी बॅकफूटवर गेले आहे. त्यातच विधानसभा निवडणुकीचा निकाल चर्चेत आला होता. निवडणुकांची तयारी करणे कठीण आहे. पुढील मे महिना हा कडक उन्हाळा व जून, जुलै महिन्यात मोठ्या प्रमाणात पावसाची शक्यता असते. त्यामुळे जरी निवडणुका ठरल्या तरी त्या सप्टेंबरनंतर होऊ शकतात, असा अंदाज बांधला जात आहे.

अशा कार्यकर्त्यांना काही मदत तसेच राजकीय पदे देऊन किंवा भविष्यातील राजकारणासंदर्भात काही शब्द देऊन पुढील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत आपापल्या विचारांचे मतदारसंघ हे फुलद्रूप करण्याचे डावपेच आखले जात आहेत. आगामी निवडणुकीत मतदारसंघात मांड पक्की करण्याचे करण्याचे धोरण हे मंत्र्यांनी आखल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक लवकरच दृष्टिपथात आहेत, अशी शक्यता निर्माण झाली आहे.

अनेक आमदार, मंत्री हे मंत्रालयात कमी परंतु आपआपल्या मतदारसंघात आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांची संघटन बांधणी करताना दिसून येत आहेत. त्यासाठी झेडपी, नगरपरिषदेच्या निवडणुकीपूर्वीची संघटनात्मक बांधणी सुरू आहे. यामध्ये मंत्र्यांच्या दौऱ्याचे निमित्त करून पक्षप्रवेश सोहळे होत आहेत. हेच संकेत मिळत आहे. सर्वोच्च न्यायालयात ओबीसी आरक्षणाचा मुद्दा न्यायप्रविष्ठ आहे. त्यातच सुनावणी सुरू झाली आहेत. आता मे महिन्यात सुनावणी होणार आहे.




### निवडणुका ऑगस्ट, सप्टेंबरमध्येच

» सर्वोच्च न्यायालयात ओबीसी आरक्षणाचा मुद्दा न्यायप्रविष्ठ आहे. त्यातच सुनावणी सुरू झाली आहेत. आता मे महिन्यात सुनावणी होणार आहे. सध्या महायुतीला पोषक वातावरण नाही. सत्तेच्या सोपानावर विराजमान झाल्यापासून राजकीय घडामोडी, गंभीर घटनांमुळे सत्ताधारी बॅकफूटवर गेले आहे. त्यातच विधानसभा निवडणुकीचा निकाल चर्चेत आला होता. निवडणुकांची तयारी करणे कठीण आहे. पुढील मे महिना हा कडक उन्हाळा व जून, जुलै महिन्यात मोठ्या प्रमाणात पावसाची शक्यता असते. त्यामुळे जरी निवडणुका ठरल्या तरी त्या सप्टेंबरनंतर होऊ शकतात, असा अंदाज बांधला जात आहे.

### ग्रामपंचायत इच्छुक नाराज

» मागील काळात अनेक ग्रामपंचायतीच्या पंचवार्षिक निवडणुका तसेच काही ठिकाणी पोटनिवडणुकांच्या कार्यक्रमसंदर्भात प्रारूप याद्या वगैरे जाहीर केल्या होत्या. परंतु त्या संदर्भात काहीच पुढील कार्यवाही न झाल्याने अनेक गावकरभारी होण्यासाठी असलेले कार्यकर्ते नाराज झाल्याचे दिसून आले आहे.

# पर्यावरणीय तंत्रज्ञानाच्या नवीन प्रकल्पाला चालना

## एमआयटी एडीटीचा जपानच्या जी-प्लेस व क्रिस एअरो सोबत त्रिपक्षीय करारआहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

एमआयटी आर्ट, डिझाइन ॲण्ड टेक्नोलॉजी विद्यापीठाने आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून विद्यापीठाने जपानमधील जी-प्लेस कॉर्पोरेशन आणि पुण्यातील क्रिस एअरो सर्व्हिसेस प्रा. लि. यांच्यासोबत एक त्रिपक्षीय सामंजस्य करार केला आहे. या कराराअंतर्गत पर्यावरण अभियांत्रिकी क्षेत्रातील एक नविन प्रकल्प राबविण्यात येणार आहे.



या प्रकल्पाअंतर्गत जी-प्लेसने विकसित केलेली 'डोमेस्टिक मल्टी-रिसायकलर' (ऊचठ) तंत्रज्ञान प्रणाली ज्याला 'जहकासो' या नावानेही ओळखले जाते. ती एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या परिसरात पर्यावरणीय परिस्थितीत चाचणीसाठी बसविण्यात येणार आहे. करार समारंभप्रसंगी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. मंगेश कराड, प्र. कुलगुरू डॉ. रामचंद्र पुजेरी, अधिष्ठाता डॉ. सुदर्शन सानप, एसओईएसचे संचालक डॉ. वीरेंद्र शेटे उपस्थित होते. क्रिस एअरो सर्व्हिसेसतर्फे व्यवस्थापकीय संचालक दीपक कपाडिया, त्यांच्या पत्नी आणि पुत्र राज कपाडिया यांनी सहभाग घेतला.

या सहकार्याचा मुख्य उद्देश म्हणजे डीएमआर प्रणालीद्वारे सांडपाण्याचे शुद्धीकरण करणे आणि ते शेतीसाठी उपयुक्त पोषक पाण्यात रूपांतरित करण्याच्या शक्यता तपासण्याचा आहे. विशेष बाब म्हणजे ही प्रणाली वीज न वापरता कार्य करते. परिणामी, ती ग्रामीण भागातील गावांसाठी प्रभावी ठरू शकते. याव्यतिरिक्त, या प्रक्रियेतून निर्माण होणाऱ्या चिखलाचा वापर जैविक खत निर्मितीसाठी केला जाऊ शकतो. पाच दशकांपासून पर्यावरणीय तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात कार्यरत असलेली जी-प्लेस कॉर्पोरेशन या प्रकल्पाच्या माध्यमातून भारतात विकेंद्रीकृत सांडपाणी व्यवस्थापन आणि सेंद्रिय शेतीला चालना देण्याचा मानस बाळगते. विद्यापीठाने जपानमधील जी-प्लेस कॉर्पोरेशन आणि पुण्यातील क्रिस एअरो सर्व्हिसेस प्रा. लि. यांच्यासोबत एक त्रिपक्षीय सामंजस्य करार केला आहे. या कराराअंतर्गत पर्यावरण अभियांत्रिकी क्षेत्रातील एक नविन प्रकल्प राबविण्यात येणार आहे. तज्ज्ञांच्या मते, हा करार भारतात पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत विकासासाठी एक मैलाचा दगड ठरू शकतो.

> ही केवळ एक तांत्रिक भागीदारी नसून स्वच्छ व शाश्वत भविष्याच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे. आमच्या विद्यार्थ्यांना आता जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञानावर काम करण्याची संधी मिळणार आहे.
> - प्रा. डॉ. मंगेश कराड, कार्यकारी अध्यक्ष, एमआयटी एडीटी विद्यापीठ

> हा करार 'इनोव्हेशन विथ इम्पॅक्ट' या आमच्या दृष्टिकोनाचे प्रतिबिंब आहे. जी-प्लेस आणि एमआयटी एडीटीसह ही भागीदारी करताना आम्हाला आनंद होत आहे.
> - दीपक कपाडिया, व्यवस्थापकीय संचालक, क्रिस एअरो